**साक्षीदार क्र. १ यांचा शपथेवर पुढील सरतपास विधिज्ञ श्री. यु.सी. महाजन यांच्या मार्फत शपथेवर सुरू ः–**

या केसच्या कामी मी कागदपत्रे दाखल केली आहेत. मला जर दाखविली तर ते ओळखू शकतो. आरोपी यांने मला त्यांच्या एच.डी.एफ.सी. खात्यावर चेक दिला होता, तो या केस कामी दाखल केला आहे. रु.४,७०,०००/– रुपयाचा चेक तोच आहे. तो तारीख ११.११.२०१९ या तारखेचा आहे. त्यावर आरोपीची सही आहे त्याला **निशाण ३०.** मी तो चेक वटण्यासाठी एस.बी.आय खात्यावर भरला. आरोपीच्या खात्यावर रक्कम शिल्लक नसल्याने तो न वटता मला प्राप्त झाला. बँकने मला चेकसोबत चेक रिटर्न मेमो दिला होता. दि.१४.११.२०१९ चा मेमो मला दाखविला, तो तोच आहे. त्याला **निशाण ३१.** चेक वटला नसल्याबद्दल आरोपीला कळविले. त्यांने पैसे देवू शकत नसल्याबद्दल सांगितले. मी माझ्या वकीलामार्फेत नोटीस पाठविली. मला नोटीसची स्थळ प्रत दाखविली ती तीच आहे. त्यातील मजकूर माझ्या सांगण्याप्रमाणे आहे. त्यावर माझी व माझ्या वकीलांची सही आहे. त्याला **निशाण ३२**. मी आरोपीला नोटीस पोस्टाने पाठविली ते दाखविण्यासाठी पोस्टाने पावती दाखल केली मला पावती दाखवली. ती तीच असून तिला **निशाण ३३**. मला पोस्टाची पोंहच मिळाली नव्हती म्हणून पोस्टचा ट्रॅक रिपार्ट काढला, तो केसच्या कामी दाखल केला. मला ट्रॅक रिपार्ट दाखविला, तो तोच असून तिला **निशाण ३४.**

आरोपीने नोटीस घेतली नाही म्हणून मला ती प्राप्त झाली. मला आता लखोटा दाखविला, तो तोच आहे. त्याला **निशाण ३५**. मी या केसच्या कामी शॉप अॅक्टच्या परवाण्याची झेरॉक्स प्रत दाखल केली आहे. आरोपीने त्यांची प्रॉप्रर्टी विक्री केल्याचा उतारा दाखल केला. मला आता तो दाखविला, तो तोच आहे. त्याला **निशाण ३६** देण्यात आला.

**साक्षीदार क्र. १ यांचा उलटतपास विधिज्ञ श्री.एम.के. मलगे यांच्या मार्फत शपथेवर सुरू ः–**

आधार कार्ड प्रमाणे माझे नाव व्यंकट शामराव कामंत असे आहे. याच नावाने माझे एस.बी.आय. मध्ये खाते आहे. नि.३१ वरील बँक मेमो हा व्यंकट शामराव कामंत यांच्या नावावर आहे. नि. ३१ वरील बँक मेमो मध्ये व्यंकटेश शामराव कामा अशा नावाचा उल्लेख आहे. व्यंकटेश शामराव कामा हे माझे नाव नाही. आरोपीचा बँकेचा मेमो या केसच्या कामी जोडलेला नाही. सदर चेक सोबत एच.डी.एफ.सी. बँकेचा मेमो आहे, तसेच एच.डी.एफ.सी. बँकेचे पत्र सोबत नाही. आरोपी व माझी ओळखत विस वर्षापासूनची आहे. मी आरोपीच्या कुंटुंबाना ओळखत नाही. माझे शिक्षण एम.बी.एड् पर्यंत झाले आहे. मी आणि आरोपी एका वर्गात कधी शिकायला नव्हतो. माझे मुळ गाव कसराळ, ता.उदगीर असे आहे. आरोपीचा पूर्ण राहता पत्ता मला माहिती नाही. राहता पत्ता माहिती नसल्यामुळे मी कॉलेजच्या पत्यावर नोटीस पाठविली आहे. मला आता निशाण ३५ वरील नोटीस दाखविली. त्यावर आरोपीचा घराचा व कॉलेजचा पत्ता दोन्ही एकत्र लिहलेले आहेत.

आरोपीचा सध्या राहण्याचा पत्ता कॉलेज असल्यामुळे तिथला आहे. आरोपीचा उदगीर मधील राहण्याचा पत्ता मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, दोन वेगवेगळे पत्ता असल्यामुळे कुठ्या पत्त्यावर नोटीस गेली हे समजून येत नाही. हे म्हणणे खरे नाही की, पत्ता चुकीचा असल्याने पोस्टमॅनच्या मदतीने नोटीस बजावल्याचा मी केसच्या कामी दाखल करुन घेतला आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने नोटीस घेण्यास इन्कार केला हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीला नोटीस मिळाली नाही.

आरोपीला नोटीस कधी बजावली व केसला कारण कधी उद्भवले याचा उल्लेख मी नोटीसमध्ये केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, ही केस दाखल करण्यासाठी मला कारण घडले नाही. २०१४ पासून माझे सिमेंट रेतीचे विक्रीचे दुकान आहे. २०१४ पासूनचा दुकानाचा परवाना दाखल करु शकतो. आरोपीने माझ्या कधी ही साहित्य घेतल्याची तक्रार माझी नाही. माझ्या दुकानाचे खाते बँकेत आहे. २०१६-२०१७ ला मी दुकान बंद केले. २०१५ साली माझे दुकान चालू होते. आरोपीला रुपये चार लाख सत्तर हजार कॅश मध्ये दिली. ती मला

व्यापारातून प्राप्त झालेल्यातून दिली होती. २७ ऑगस्ट २०१५ ला त्याला पैसे दिले होते. माझ्या पुराव्याच्या प्रतिज्ञापत्रामध्ये दुकान बंद केल्यामुळे मी आरोपीला पैसे दिल्याचा उल्लेख केलेला आहे. हे म्हणणे बरोबर आहे की, यापुर्वी दुकान २०१६ ला बंद केल्याचे सांगीतले हे मी खोटे सांगत आहे.

**(न्यायालयाची कामकाजाची वेळ संपल्यामुळे पुढील तारखेपर्यंत प्रकरण तहकूब करण्यात आले.)**

श्रवणोत्तर स्वीकृत,

Digitally signed by VIJAY RAMCHANDRA GHARAL
Date: 2026.02.12 18:14:08 +0530

दिनांकः– १२.०६.२०२४ न्यायदंडाधिकारी प्र.व.
उदगीर (न्यायालय क्रं. १), उदगीर